जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2025
सकाळ

# वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची द्वारे पंजाबराव देशमुख यांनी खुली केली

## डॉ. अशोक राणा : फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

कोल्हापूर, ता. १० : पंजाबराव देशमुख यांनी विदर्भामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून वंचित व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली, असे प्रतिपादन डॉ. अशोक राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या दुसऱ्यादिवशी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक कार्य व विचार' हा त्यांचा विषय होता. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

डॉ. राणा म्हणाले, 'औपचारिक शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांसाठी लोक विद्यापीठाची स्थापना व्हावी, अशी देशमुख यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी निरंतर शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन त्यांचे कार्य चालू ठेवले. त्यांची देशाचे कृषिमंत्री व एक नेते म्हणून ओळख सर्वश्रुत आहे; परंतु, ते एक संशोधक होते, याकडे लोकांचे दुर्लक्ष झाले आहे. त्यांनी प्राचीन भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने वैदिक साहित्याचे केलेले संशोधन कार्य अत्यंत मोलाचे आहे. देशमुख यांनी संत गाडगे महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर कार्य केले.

गाडगे महाराजांनी त्यांनी सुरू केलेल्या विद्यार्थी वासतिगृहाच्या कार्यात मदत केली. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकर यांना त्यांनी केलेले सहकार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी त्या काळात केलेल्या सूचनांचे पालन केले असते तर आज जे काही इतर मागासवर्गीय समाज घटकांच्या आरक्षणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत, ते सुटले असते.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2025

तरुण भारत

# निरंतर, औपचारिक शिक्षणासाठी पंजाबराव देशमुख यांचा आग्रह




■ डॉ. राणा यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

औपचारिक शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांसाठी लोक विद्यापीठाची स्थापना व्हावी, अशी इच्छा पंजाबराव देशमुख यांची होती. त्यासाठी त्यांनी निरंतर शिक्षणाचा आग्रह धरला. पंजाबराव देशमुख यांनी विदर्भामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून वंचित व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे द्वार खुली केली, असे प्रतिपादन डॉ. अशोक राणांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित फुले – शाहू – आंबेडकर सप्ताह व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक कार्य व विचार' हा या व्याख्यानाचा विषय होता. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी हाते.

डॉ. राणा म्हणाले, पंजाबराव देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आपले कार्य पुढे चालू ठेवले. त्यांची देशाचे कृषिमंत्री व एक नेते म्हणून ओळख सर्वश्रुत आहे परंतू ते एक संशोधक होते. याकडे लोकांचे दुर्लक्ष झाले आहे. देशमुख यांनी प्राचीन भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने वैदिक साहित्याचे केलेली संशोधन कार्य अत्यंत मोलाचे आहे. देशमुख यांनी संत गाडगे महाराज व डॉ. आंबेडकर यांच्याबरोबर कार्य केले. गाडगे महाराजांनी त्यांनी सुरु केलेल्या वासतिगृहाच्या कार्यात मदत केली. राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पंजाबराव देशमुख यांनी केलेले सहकार्य महत्त्वाचे आहे. पंजाबराव देशमुख यांनी त्या काळात केलेल्या सूचनेचे पालन केले असते तर आज जे काही इतर मागासवर्गीय समाज घटकांच्या आरक्षणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत ते सुटले असते, असे ते म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2025
सकाळ

# निरंतर, औपचारिक शिक्षणासाठी पंजाबराव देशमुख आग्रही : डॉ. राणा

कोल्हापूर, ता. १० : 'औपचारिक शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांसाठी लोक विद्यापीठाची स्थापना व्हावी, अशी इच्छा पंजाबराव देशमुख यांची होती. त्यासाठी त्यांनी निरंतर शिक्षणाचा आग्रह धरला. देशमुख यांनी विदर्भामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून वंचित व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली,' असे प्रतिपादन डॉ. अशोक राणा यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते.

ते म्हणाले, ''देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आपले कार्य पुढे चालू ठेवले. त्यांची देशाचे पहिले कृषिमंत्री व एक नेते म्हणून ओळख सर्वश्रुत आहे. परंतु, ते एक संशोधकही होते. पंजाबराव देशमुख यांनी प्राचीन भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने वैदिक साहित्याचे केलेले संशोधन कार्य अत्यंत मोलाचे आहे.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2025

सकाळ

# संकटांना संधी समजून जीवनात यशस्वी व्हा : डॉ. अशोक भोईटे

कोल्हापूर, ता. १० : टाकीचे घाव सोसल्याशिवाय जसे दगडास देवपण मिळत नाही, तसे कष्टाशिवाय जीवनात यश मिळत नाही. त्यामुळे संकटाला संधी समजून प्रत्येक विद्यार्थ्याने जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे यांनी केले.

न्यू कॉलेजच्या पारितोषिक वितरण आणि गुणगौरव समारंभात ते बोलत होते. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील अध्यक्षस्थानी होते. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. अमर सासने यांनी वर्षभरात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त श्रीधर निगडे, आफिन अख्तार, वैष्णवी पाटील यांचा विशेष सत्कार केला. संस्थेचे उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, खजानीस वाय. एस. चव्हाण, संचालक डॉ. पी. के. पाटील, पी. सी. पाटील, वाय. एल. खाडे, सचिव एस. जी. मेटल, उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. जी. जगताप, पर्यवेक्षक प्रा. एम. बी. गडदे, प्रबंधक एम. वाय. कांबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2025
सकाळ



कोल्हापूर : सायबर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा उपवास केला.

# सायबरच्या विद्यार्थ्यांनी केला मोबाईल उपवास

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : सायबर महाविद्यालयात शिकणाऱ्या तब्बल ४० विद्यार्थ्यांनी आज मोबाईलचा उपवास केला. सकाळी महाविद्यालयात आल्यानंतर शिक्षकांकडे मोबाईल सुपूर्द करून दिवसभर मोबाईल न पाहता दिवस व्यतित केला. मोबाईल नसल्याने निवांतपणा, शांतता जाणवल्याचे या विद्यार्थ्यांनी सांगितले. सायबर महाविद्यालयाच्या दिनकरराव शिंदे समाजकार्य विभागातील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. डॉ. दीपक भोसले यांनी ही संकल्पना मांडली.

डॉ. भोसले म्हणाले, 'दिवसेंदिवस आजची तरुण पिढी मोबाईलच्या आहारी गेल्याचे जाणवते. यामुळे मानसिक असंतुलनासोबत शारीरिक व्याधींमध्येही वाढ झालेली पाहायला मिळते. वास्तविक मोबाईल फोनचा शोध हा एकमेकातील संवाद वाढावा यासाठी लागला होता. परंतु, कालानुरूप याचा वापर विसंवादासाठी होऊन सोशल मीडियाचा अतिरिक्त वापर सर्व वयोगटात दिसत आहे.'

संपूर्ण दिवस मोबाईलचा वापर न करता राहिल्यानंतर विद्यार्थ्यांच्या लेखी प्रतिक्रियाही शिक्षकांनी घेतल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईलची कमतरता जाणवली, सतत हाताशी असणारा मोबाईल नसल्याने चुकल्यासारखे वाटले. मात्र, कोणाचाही फोन आला नाही, सोशल मीडियावर रिल्स पाहिले नाही. यामुळे बराचसा वेळ रिकामा मिळाला. तो सत्कारणी लावला तर नक्कीच करिअरसाठी फायदा होत असल्याचे नमूद केले.